# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☏ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ Email : jdtepu@pn3.vsnl.net.in

स्परणपत्र

जा.क्र.विकापु/मा.अ./०७-०८/8329 दिनांक : 01/11/2007

प्रति,

प्राचार्य,
शासकीय / शासकीय अनुदानित / विना अनुदानित
अभियांत्रिकी / औषधनिर्माण शास्त्र / वास्तुशास्त्र /
हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी /
पदवी / पदविका अभ्यासक्रम तसेच पदव्यूत्तर पदवी व्यवस्थापन
एम. बी. ए. / एम. सी. ए. अभ्यासक्रम

विषयः **माहितीचा अधिकार अध्यादेश अधिनियम २००५ ची अंमलबजावणी**
(श्री. अनिल पाठक)

संदर्भ : १)मा. संचसलक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/मा.अ.-२४/२००७/७२२ दिनांक १३-०८-२००७
२) या कार्यालयाचे पत्र क्र. विकापु/मा. आ./०७-०८/७२०७ दिनांक २२-०८-२००७

शासकीय / शासकीय अनुदानित / विना अनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माण शास्त्र / वास्तुशास्त्र /हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी / पदवी / पदविका अभ्यासक्रम तसेच पदव्यूत्तर पदवी व्यवस्थापन एम. बी. ए. / एम. सी. ए. अभ्यासक्रम चालविणा-या या विभागातील सर्व संस्थांना कळविण्यात येते की, श्री. अनिल पाठक यांनी माहितीच्या अधिकारा अंतर्गत खालील मुद्यांच्या अनुषंगाने माहिती मागितलेली आहे. तरी आपल्या संस्थेची बिनचूक माहिती या कार्यालयास त्वरित सादर करण्याबाबत वरील संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये सुचित केले होते, तथापी ब-याच संस्थांनी सदरची माहिती या कार्यालयास सादर केलेली नाही. ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असून, याबाबत होणा-या दंडात्मक कार्यवाहीस संपूर्णपणे संस्था प्रमुखांना जबाबददार धरण्यात येणार आहे. सं**सदरची माहिती माहिती अधिकाराअंतर्गत शासनास सादर करावयाची असल्याने प्रथम प्राध्यान्य देण्यात यावे. सदरची माहिती त्वरित सादर न केल्यास होणा-या दंडात्मक कार्यवाहीची सुपूर्ण जबाबदारी संस्था प्रमुखाची राहील याची नोंद ध्यावी.**

१) संस्थेतील अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थ्यांची संख्या किती आहे.

२) आपल्या संस्थेतील ए.आय.सी.टी.च्या नामर्सप्रमाणे आवश्यक असणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि सध्या कार्यरत असणारे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांची संख्या

३) कर्मचा-यांना दिले जाणारे वेतन ( पाचवा)

४) कर्मचा-यांच्या सेवाशर्ती या शासनमान्य आहेत का ?

५) विद्यापीठ अनुदान आयोग यांच्य संबंधीत आहे काय ?

वरील सर्व मुद्यांबाबतची माहिती हींदीमधून खाली दर्शविलेल्या विवरणपत्रामध्ये अभ्यासक्रमनिहाय माहिती भरुन या कार्यालयास दोन प्रतीत सादर करावी.

| अ.क्र. | संस्थेका नाम | पाठयक्रम व प्रवेशक्षमता | संस्था मे आवश्यक शिक्षक कर्मचारी (As per AICTE norms) | संस्थामे प्रत्यक्ष कार्यरत कर्मचारी | शिक्षक कर्मचारीयों को दिए जानेवाली वेतनश्रेणी | संस्था मे कार्यरत शिक्षकेत्तर कर्मचीरयोंको श्रेणीनिहाय दिएजानेवाले वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ |
| | | | | | | |

(प्रा. गो. पं. चौधरी)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे